**महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग**

जिल्हा परिषद सातारा अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधीत गट क मधील पदे भरण्यासाठी जाहिरात

पदभरती २०२१

संक्षिप्त जाहिरात क्रमांक ०१/२०२१

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाशी संबंधीत गट – क संवर्गातील केवळ नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा www.maharddzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| **अ.क्र** | **पदाचे नांव** | **दिव्यांग उमेदवारांसाठी एकूण पद संख्या** |
|---|---|---|
| १ | औषध निर्माता | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) | ०४ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | ०६ |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | १४ |

| अ.क्र. | पदाचे नांव | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | खुला | महिला | १ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) | खुला | खेळाडू | १ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | खुला | प्रकल्पग्रस्त | १ |

**अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे वेळापत्रक**

| ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ पासून | २१ सप्टेंबर २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजे पर्यंत |

**नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठीच्या** पदभरतीकरिता सविस्तर जाहिरात व जाहीर प्रकटन हे www.maharddzp.com व www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या जाहिरातीव्दारे केवळ दिव्यांग अधिनियम, २०१६ नुसार दिव्यांगांच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गाकरिता तसेच सामाजिक व आथिकदृष्टया (एसईबीसी) मागास प्रवर्ग रद्द झाल्याने, खुल्या प्रवर्गांतर्गत नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरिता नव्याने जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

यापुर्वी माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीमधील दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता (OL, BL)(एका पायाने/दोन्ही पायाने दिव्यांग) साठी अर्ज केलेल्या उमेदवारांचे, नव्याने अर्ज मागविण्यात येणार नसल्याने, या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या दिव्यांगांच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गाकरिताच, दिव्यांग उमेदवारांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या जाहिरातीव्दारे एका उमेदवाराला, एकाच जिल्हा परिषदेसाठी अर्ज सादर करता येईल. त्यानुसार उमेदवारांने एकाच जिल्हा परिषदेची निवड करुन, नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठी अर्ज सादर करावा.

वरील पदांची माहिती , शैक्षणिक अर्हता व अनुभव , कमाल व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रीया शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मागदर्शक सुचना, परिक्षेचे स्वरुप, निवड पध्दत , सर्वसाधारण अटी व शर्ती इ. बाबत अधिक माहितीची सविस्तर जाहिरात www.maharddzp.com व www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलबध आहे. अर्ज करण्यासाठी www.maharddzp.com हे संकेतस्थळ दिनांक 01/09/2021 ते 21/09/2021 अखेर कार्यरत राहील. अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवाराने सविस्तर जाहिरातीमधील व जाहीर प्रकटनातील दिलेल्या सर्व सूचना काळजीपुर्वक वाचून अर्ज सादर करावेत. भरती प्रक्रीया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे , पदाच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ करणे किंवा घट करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती ला राहतील त्या बाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण :- सातारा
दिनांक :- 25/08/2021.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| सदस्य सचिव, निवड समिती<br>तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जि.प.सातारा | सदस्य, निवड समिती<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जि.प.सातारा | अध्यक्ष, जिल्हा निवड समिती<br>सातारा तथा जिल्हाधिकारी<br>सातारा |